महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

(desk20.dgoffice@mahapolice.gov.in)

क्र.पोमसं/२०/१९५/जनगणना-२७ नोडल अधिकारी/६०/२०२६ मुंबई, दिनांक :- ०९/०७/२०२६

**विषय** :- विशेष सखोल पुनरावलोकन (SIR) अनुषंगाने लोकांमध्ये जनजागृतीसाठी जाहिराती प्रसिध्द करण्याबाबत.

** ** ** ** **

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४/निवडणूक-५, दि.२६/०६/२०२६ ची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली आहे.

तरी, पोलीस आयुक्त / अधीक्षक यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबत जोडलेल्या पत्रांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लवकरात लवकर शासनास परस्पर सादर करावा व त्याची एक प्रत या कार्यालयास पाठवावी.

(सागर पाटील)
सहायक पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)

प्रत,
अवर सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य
(क्र.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.२४/निवडणूक-५, दि. २६/६/२६)

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

ई-मेल:- sveep-election@mah.gov.in
दूरध्वनी क्रमांक:- ०२२-२२८५६६६२

क्र .संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४/निवडणूक-५
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार,
मुंबई-४०००३२.
दिनांक: २६.६.२०२६

प्रति,

पोलीस महासंचालक, (DGP)
शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई - ०१.

विषय :- विशेष सखोल पुनरावलोकन (SIR) अनुषंगाने लोकांमध्ये जनजागृतीसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगाच्या दि.१४.०५.२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील विशेष सखोल पुनरिक्षण-२०२६ अभियान कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. "प्रत्येक पात्र मतदाराची मतदार यादीत नोंदणी व्हावी आणि कोणत्याही अपात्र नावाचा समावेश होऊ नये", या उद्दिष्टाने विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) आयोजित केले जात आहे. विशेष सखोल पुनरिक्षण ही महत्वाची व प्राधान्याची बाब असून आपण व आपल्या विभागाने सदर अभियानास व्यापक प्रसिध्दी देण्याची आवश्यकता आहे.

याकरिता आपल्या कार्यालयाच्या संकेत स्थळावरुन, ट्वीटर हॅन्डल, व आपल्याकडे उपलब्ध असलेल्या प्रचार माध्यमातून/सोशल मिडीया, मोबाईल संदेशाद्वारे व समाज माध्यमांवर सोबत जोडलेल्या प्रचार साहित्यास विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) अभियान कालावधीपर्यंत व्यापक प्रमाणात विनामुल्य प्रचार प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर त्याचे फोटो व अहवाल या कार्यालयास सादर करावे, ही विनंती.

सदर प्रचार साहोत्याची गुगल लिंक पुढीलप्रमाणे आहे :-
https://drive.google.com/drive/folders/१Y७W२JJzkUlcM२z१SLYclQcxi९BZ१DpQB?usp=sharing

आपला,

(विक्रम निकम)
अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य